## आजचे पंचांग

शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, प्रतिपदा सकाळी ८-४३ पर्यंत
दिवस नक्षत्र-चित्रा संध्याकाळी ७-२५ पर्यंत
चंद्र रास - तुला, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## मुंबईत घर खरेदीत वाढ

**मुंबई:** इराणच्या युद्धामुळे एकीकडे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसल्याचे म्हटले जात असताना मुंबईत रिअल इस्टेट मार्केटमध्ये मात्र बूम आली आहे. यंदा मुंबईत मार्च महिन्यात गेल्या १४ वर्षांचा रेकॉर्ड तुटत घर खरेदी झाली आहे. इराण युद्ध सुरु असले तरी मुंबईतील रिअल इस्टेट सेक्टरने मार्च २०२६ मध्ये मजबूत वेग पकडला आहे. रजिस्ट्रेशन दरवर्षी वाढ होत असून स्टँप ड्युटी कलेक्शनमध्ये देखील उसळी आली आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ३ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### दिल्लीत सीएनजी सिलिंडरचा स्फोट

**नवी दिल्ली :** द्वारका येथील नजफगड-मित्रॉन रस्त्यावरील सीएनजी पंपावर गुरुवारी एका ट्रकचा सीएनजी सिलेंडर भरत असताना त्याचा स्फोट झाला, यात चार जण जखमी झाले असून, त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. एक पंप अटेंडंट ट्रकमध्ये कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस भरत असताना त्याच्या एका सिलेंडरचा स्फोट झाला, ज्यात घटनास्थळी उपस्थित असलेले चार जण जखमी झाले.

### विझाग बंदराची विक्रमी हाताळणी

**विशाखापट्टणम :** व्हीपीएने सांगितले की, त्यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान विक्रमी ९१.१७ दशलक्ष टन मालाची हाताळणी केली, जी त्यांच्या ९२ वर्षांच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वाधिक हाताळणी आहे, आणि २०२६-२७ मध्ये १०० दशलक्ष टनांचा टप्पा ओलांडण्याचा विश्वास व्यक्त केला. विशाखापट्टणम पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष एम. अंगमुथू म्हणाले की, या कामगिरीने २०२४-२५ मधील ८२.६२ दशलक्ष टनांचा पूर्वीचा विक्रम मागे टाकत एक नवीन मापदंड स्थापित केला आहे.

### अमेठीमध्ये भरधाव बसची दुचाकीला धडक

**अमेठी (उत्तर प्रदेश) :** येथे गुरुवारी भरधाव वेगाने जाणाऱ्या राज्य बसने मोटारसायकलला धडक दिल्याने दोन जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. पिपरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुर्गापूर चौकाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या बसने दुचाकीला धडक दिल्याने हा अपघात घडला, ज्यामध्ये चंदेरिया गावातील रेहान अली (४०) आणि रमजान अली (६०) गंभीर जखमी झाले.

### शॅम्पू, दूध पिशव्या ते औषधांपर्यंत दिलासा; पेट्रोकेमिकल कच्च्या मालावरील आयात शुल्क हटवले

# पुण्याला मुसळधार पावसाने झोडपले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** उन्हाच्या तीव्र चटक्यांनी हैराण झालेल्या पुणेकरांना गुरुवारी निसर्गाने अनपेक्षित धक्का दिला. दुपारच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने शहराला झोडपून काढले. काही क्षणांतच आभाळ दाटून येत भरदिवसा अंधार पसरला आणि विजांच्या कडकडाटासह पावसाने अक्षरशः हजेरी लावली. या अवकाळी पावसाचा फटका शहरासह ग्रामीण भागालाही बसला असून अनेक ठिकाणी गारपीट झाली.

मुसळधार पावसामुळे शहरातील सखल भागांत मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. जंगली महाराज रस्ता, स्वारगेट आणि वारजे परिसरात रस्त्यांवर तब्बल एक ते दोन फूट पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला. काही ठिकाणी रस्त्यांना अक्षरशः नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले. पावसाचा जोर इतका होता की काही भागांत वाहने पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याच्या घटनाही समोर आल्या.

सोसाट्याच्या वाऱ्यासह ढगांच्या गडगडाटामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली. महापालिका आणि अग्निशमन दलाला तातडीने घटनास्थळी धाव घ्यावी लागली. पावसासोबत आलेल्या गडद ढगांमुळे शहरात उजेड अत्यल्प झाला. परिणामी वाहनचालकांना भरदिवसाही वाहनांचे हेडलाईट सुरू करावे लागले.

उन्हाळ्याचे दिवस असल्याने नागरिकांकडे छत्री किंवा रेनकोट नसल्याने अचानक कोसळलेल्या पावसात अनेकांची तारांबळ उडाली. सिंहगड रस्ता, धनकवडी, कात्रज, हडपसर, लोहगाव, खराडी तसेच पिंपरी चिंचवड परिसरात गारांसह पावसाची नोंद झाली. या पावसामुळे तापमानात काही प्रमाणात घट झाली असली तरी जनजीवन मात्र विस्कळीत झाले.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील दोन दिवस शहरात ढगाळ वातावरण राहणार असून संध्याकाळच्या सुमारास मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. प्रशासनाने नागरिकांना पावसाच्या वेळी झाडाखाली उभे राहू नये, विजेपासून सावध राहावे आणि सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## महाराष्ट्रावर पावसाचं मोठं संकट, 20 जिल्ह्यांना हाय अलर्ट

### आयएमडीचा झोप उडवणारा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पुन्हा एकदा अवकाळी पावसाचं मोठं संकट निर्माण झालं आहे. महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

एप्रिल महिना सुरू झाला आहे, सर्वसामान्यपणे एप्रिल महिन्यात देशातील अनेक राज्यांमध्ये उन्हाचा कडका चांगलाच जाणवत असतो, प्रचंड उष्णता असते. मात्र यंदा वातावरणात मोठा बदल पहायला मिळत आहे. भारतीय हवामान विभागाकडून (IMD) देशातील अनेक राज्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील काही दिवस देशातील अनेक भागांमध्ये वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग हा प्रति तास 70 किमी एवढा राहू शकतो, असंही हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिमी विक्षोभ पूर्णपणे सक्रिय झाला आहे, याचा परिणाम देशातील जवळपास सर्वच राज्यांवर पडण्याची शक्यता आहे. उत्तर भारत, मध्य भारत आणि पूर्व भारतातील अनेक राज्यांना अवकाळीचा तडाखा बसण्याची शक्यता आहे. काही भागांमध्ये तर अतिमुसळधार पाऊस होऊ शकतो, असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पुढील तीन ते चार दिवस तापमानात मोठ्या प्रमाणात घट होईल असंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

## बारामती बिनविरोध नाही?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. सुरुवातीला ही निवडणूक बिनविरोध होईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती; मात्र आता परिस्थिती बदलताना दिसत आहे.

निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून सुमारे ३० जणांनी अर्ज नेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात किती उमेदवार अर्ज दाखल करतात आणि माघारीनंतर किती उमेदवार रिंगणात राहतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढणार हे निश्चित मानले जात आहे. त्यांच्या विरोधात पहिल्याच दिवशी तीन जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने निवडणूक बिनविरोध होण्याच्या चर्चेला मोठा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे अर्ज दाखल करणारे काही उमेदवार स्थानिक नसून बाहेरील जिल्ह्यांतील असल्याची माहिती आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

राजकीय समीकरणांच्या दृष्टीने ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. काँग्रेसनेही ही निवडणूक लढण्याची तयारी दर्शवली असून महाविकास आघाडीत अंतिम निर्णयानंतर उमेदवार जाहीर केला जाईल, असे संकेत दिले आहेत.

### शॅम्पू, दूध पिशव्या ते औषधांपर्यंत दिलासा; पेट्रोकेमिकल कच्च्या मालावरील आयात शुल्क हटवले

# अत्यावश्यक 40 वस्तूंवर कस्टम ड्युटी माफ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत 40 पेक्षा अधिक अत्यावश्यक पेट्रोकेमिकल वस्तूंवरील कस्टम ड्युटी (सीमा शुल्क) पूर्णपणे माफ केली आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ही सवलत 2 एप्रिल 2026 पासून लागू झाली असून 30 जून 2026 पर्यंत कायम राहणार आहे.

पश्चिम आशियातील तणाव आणि कच्च्या तेलाच्या पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे जागतिक बाजारात इंधनदर वाढले आहेत. याचा परिणाम उत्पादन खर्चावर होत असून, त्याचा भार थेट ग्राहकांवर पडत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने आधीच पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर 10 रुपयांनी कमी केले होते. त्यानंतर आता पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील आयात शुल्क हटवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा थेट फायदा प्लास्टिक, पॅकेजिंग, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, रसायन उद्योग, ऑटोमोबाईल पार्ट्स अशा विविध क्षेत्रांना होणार आहे. उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल स्वस्त झाल्याने अंतिम उत्पादनांच्या किमतीतही घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.सरकारने ज्या वस्तूंवरील शुल्क माफ केले आहे त्यामध्ये मिथेनॉल, टोल्युइन, स्टायरिन, विनाइल क्लोराइड मोनोमर, मोनोइथिलीन ग्लायकॉल , फिनॉल, ऍसिटिक ऍसिड, प्युरिफाइड टेरेफ्थॅलिक ऍसिड (PTA), पॉलिथिलीन, पॉलिप्रोपिलीन, पॉलिस्टायरिन, पीव्हीसी, पीईटी तसेच एबीएस आणि पॉलिकार्बोनेट यांसारख्या अभियांत्रिकी प्लास्टिकचा समावेश आहे. या कच्च्या मालाचा वापर दैनंदिन जीवनातील अनेक वस्तू तयार करण्यासाठी होतो. उदाहरणार्थ, पाण्याच्या व शीतपेयांच्या बाटल्या, दूध पिशव्या, शॅम्पू व तेलाच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, फूड पॅकेजिंग, औषधांचे साहित्य, खेळणी, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे भाग अशा विविध वस्तूंमध्ये यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. त्यामुळे या वस्तूंच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. अर्थ मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, जागतिक पुरवठा साखळीतील अडचणींमुळे उद्योगांना कच्चा माल महाग मिळत होता. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून महागाईत भर पडत होती. या पार्श्वभूमीवर उद्योगांना दिलासा देणे आणि ग्राहकांवरील आर्थिक ताण कमी करणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय अल्पकालीन असला तरी त्याचा सकारात्मक परिणाम बाजारावर होऊ शकतो. उत्पादन खर्च कमी झाल्यास कंपन्या किंमती कमी ठेवण्याची शक्यता आहे, ज्याचा थेट फायदा सर्वसामान्य ग्राहकांना होईल. सरकारच्या या निर्णयामुळे महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवण्यास मदत होणार आहे.

### उच्चस्तरीय बैठकीत भारताचा सहभाग

## होर्मुझ सामुद्रधुनी प्रकरणी ब्रिटनचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संपूर्ण जगाचे लक्ष वेधलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव निवळण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय व्यापार मार्ग पुन्हा सुरळीत करण्यासाठी युनायटेड किंगडमने पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात चर्चा करण्यासाठी ब्रिटनने भारतसह अनेक देशांना निमंत्रित केले असून, परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी उच्चस्तरीय बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व करणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत असून विशेषतः कच्चे तेल, एलएनजी आणि एलपीजी वाहतुकीवर ताण निर्माण झाला आहे. ही परिस्थिती लक्षात घेता भारताने या भागात आपली मुत्सद्दी हालचाल वाढवली आहे. भारतीय जहाजांची वाहतूक सुरक्षित आणि विनाअडथळा सुरू राहावी यासाठी भारत इराणसह संबंधित प्रादेशिक देशांशी सातत्याने संपर्कात असल्याची माहिती देण्यात आली.

रणधीर जैस्वाल यांनी सांगितले की, भारत इराण आणि इतर देशांच्या संपर्कात असून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यावर भर देत आहे. भारताच्या या प्रयत्नांना काही प्रमाणात यश मिळाले असून गेल्या काही दिवसांत सहा भारतीय जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे मार्गस्थ झाली आहेत. मध्यपूर्वेतील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीबाबत कठोर भूमिका घेतली असली तरी भारताच्या मालवाहू जहाजांना विशेष सवलत देण्यात आली आहे. भारत हा अशा मोजक्या देशांपैकी एक आहे, ज्यांच्या जहाजांना या महत्त्वाच्या जलमार्गावरून जाण्यास परवानगी देण्यात आली आहे. या जहाजांमधून भारतासाठी अत्यावश्यक असलेले एलपीजी आणि एलएनजी ऊर्जा संसाधनांची वाहतूक केली जात आहे.

दरम्यान, भारतीय जहाजांकडून होर्मुझ सामुद्रधुनीतून जाण्यासाठी कोणतेही टोल किंवा शुल्क आकारले जात असल्याच्या चर्चांना परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्टपणे फेटाळून लावले आहे. अशा प्रकारची कोणतीही टोल प्रणाली अस्तित्वात नसल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

जगातील मोठ्या प्रमाणातील कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू या मार्गाने वाहतूक होत असल्याने येथे निर्माण होणारा तणाव थेट जागतिक अर्थव्यवस्था आणि ऊर्जा बाजारावर परिणाम करणारा ठरतो.

### भाजपला दिल्लीतूनही हाकलून लावणार

**बैष्णवनगर (पश्चिम बंगाल) :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी भाजपला आधी राज्यातून आणि नंतर दिल्लीतून हाकलून देण्याची शपथ घेतली. तसेच, निवडून आलेले सरकार असूनही निवडणूक आयोगच प्रशासन चालवत असल्याचा आरोपही त्यांनी केला. "हे माझं वचन आहे, मी भाजपला आधी बंगालमधून आणि नंतर दिल्लीतून हाकलून देईन," असे ममता यांनी सांगितले. येथे एका निवडणूक सभेला संबोधित करताना, ममता बॅनर्जी यांनी मालदामध्ये बुधवारी सात न्यायिक अधिकाऱ्यांवर झालेल्या घेराव आणि हल्ल्याचा निषेध केला. हे प्रकरण चांगलेच तापले आहे.

## सायबर गुन्हेगारांना क्षमा नको

### सरन्यायाधीश सूर्यकांत यांची कठोर टिप्पणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** एखादा खुनी सुधारू शकतो आणि त्याला सुधारण्याची संधी दिली जाऊ शकते, परंतु सायबर गुन्हेगारांना अजिबात सोडू नये. अशा गुन्हेगारांना क्षमा नको, त्यांना मोबाईल फोन किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यापासून पूर्णपणे रोखून, त्यांना स्वतंत्र कोठडीत ठेवणे हाच एकमेव मार्ग आहे. या गुन्हेगारांना हाताळण्याचा हाच सर्वोत्तम पर्याय आहे, अशी अत्यंत कडक टिप्पणी एका सायबर गुन्ह्याच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी गुरुवारी केली.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर फसवणूक प्रकरणातील आरोपी सूरज श्रीवास्तव याच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्याचा जामीन फेटाळला होता, त्या आदेशाला त्याने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. जामीन अर्जावर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, एखादा खुनी सुधारू शकतो आणि त्याला सुधारण्याची संधी दिली जाऊ शकते, परंतु सायबर गुन्हेगारांना अजिबात सोडू नये. अशा गुन्हेगारांना क्षमा नको, त्यांना मोबाईल फोन किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करण्यापासून पूर्णपणे रोखून, त्यांना स्वतंत्र कोठडीत ठेवणे हाच एकमेव मार्ग आहे.

श्रीवास्तववर आयपीसीच्या कलम ४२०/१२०बी आणि आयटी ॲक्टच्या कलम ६६डी अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. तो १२ मे २०२५ पासून तुरुंगात आहे. त्याच्यावर यापूर्वीही तीन गुन्हे नोंद आहेत. दरम्यान, मागील वर्षी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणांची स्वतःहून दखल घेतली होती.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निवडणूक आयोगाला पत्र

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या सत्तासंघर्षाचे संकेत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी भारतीय निवडणूक आयोगाला पत्र लिहून पक्षातील महत्त्वाच्या पत्रव्यवहाराबाबत स्पष्ट भूमिका मांडल्याने पक्षातील अंतर्गत सत्तासंघर्ष पुन्हा उफाळून आला आहे. २८ जानेवारी ते त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्तीच्या तारखेपर्यंत पक्षाच्या नेत्यांनी केलेला कोणताही पत्रव्यवहार अधिकृत मानू नये, असे त्यांनी निवडणूक आयोगाला कळवले आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर दोन दिवसांनी, म्हणजेच २८ फेब्रुवारी रोजी त्यांनी हे पत्र लिहिले होते. या पत्रामुळे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक आयोगाला पाठवलेले पत्र अवैध ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या पत्रात अजित पवार यांच्या अनुपस्थितीत पक्षाचे निर्णय घेण्याचा अधिकार प्रफुल्ल पटेल यांच्याकडे सोपवण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र सुनेत्रा पवार यांच्या नव्या पत्रामुळे हा दावा अमान्य ठरू शकतो. विशेष म्हणजे, सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात प्रफुल्ल पटेल किंवा सुनील तटकरे यांचा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे हे दोन्ही नेते अजूनही त्यांच्या पदांवर कायम आहेत की त्यात बदल करण्यात आला आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पक्षातील घडामोडींची माहिती असलेल्या सूत्रांच्या मते, सुनेत्रा पवार यांनी विद्यमान समिती बरखास्त करून स्वतःचा नवीन संघ तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे पटेल आणि तटकरे यांना पुढे पक्षातील पदे गमवावी लागू शकतात. सूत्रांच्या माहितीनुसार, पटेल आणि तटकरे यांनी नियुक्त केलेल्या डिझाइन बॉक्स या राजकीय प्रचार आणि जनसंपर्क कंपनीसोबतचा करारही सुनेत्रा पवार यांनी रद्द केल्याचे सांगितले जात आहे. या कंपनीचे नेतृत्व नरेश अरोरा करत होते.
रोहित पवार यांनी आरोप केला आहे की, अजित पवार यांच्या निधनानंतर प्रफुल्ल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पक्षात दोन गटांमध्ये संघर्ष सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे.
निरीक्षकांच्या मते, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाची प्रतिमा मोठ्या प्रमाणात ढासळली आहे. काही मंत्र्यांचे राजीनामे, विविध वाद आणि संघटनात्मक गोंधळ यामुळे पक्ष कमकुवत झाला आहे. या परिस्थितीत पक्षाची पडझड थांबवून संघटना पुन्हा उभी करण्याचे मोठे आव्हान सुनेत्रा पवार यांच्यासमोर आहे.
अलीकडेच त्यांनी पक्षाच्या आमदारांची बैठक घेऊन पक्ष मजबूत करण्यासाठी सक्रिय राहण्याचे आवाहन केले आहे. पक्षात नेतृत्व स्थिर करण्यासाठी आणि संघटना पुन्हा उभी करण्यासाठी त्या आक्रमक पावले उचलण्याच्या तयारीत असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.
निवडणूक आयोगाला लिहिलेल्या एका पत्रामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील सत्तासमीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुनेत्रा पवार पक्षावर पूर्ण नियंत्रण मिळवण्याच्या दिशेने पावले टाकत असल्याचे दिसून येत आहे.

## अंकिता पाटील यांची महिला व बालकल्याण सभापतीपदी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील-ठाकरे या बावडा गटातून पुणे जिल्हा परिषदेत निवडून आल्यानंतर त्यांची महिला व बालकल्याण सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवल्याने हर्षवर्धन पाटील समर्थक आणि बावडा गटात उत्साहाचे वातावरण आहे.

अंकिता पाटील-ठाकरे या माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या असून त्यांनी आपल्या कार्यशैली आणि जनसंपर्काच्या जोरावर स्थानिक राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांनी इंदापूर तालुक्यात सर्वाधिक मतांनी विजय मिळवत आपली राजकीय ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली. विशेष म्हणजे त्या सलग दुसऱ्यांदा जिल्हा परिषदेत निवडून आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवली होती. त्यांच्या विजयानंतर पक्षाने त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवत महिला व बालकल्याण सभापतीपदाची धुरा दिली. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून विविध ठिकाणी जल्लोष साजरा करण्यात आला. त्यांच्या माध्यमातून महिला व बालकल्याण क्षेत्रात अधिक प्रभावी काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

### व्यसनाची रचना



**सोशल मीडिया हे तंत्रज्ञानाचे साधन नसून व्यसनाचे उद्योग बनले आहे. अनंत स्क्रोल, नोटिफिकेशन्स, अल्गोरिदम यांच्या साहाय्याने वापरकर्त्यांच्या वेळेवर, मनावर आणि निर्णयक्षमतेवर नियंत्रण मिळवले जाते. आता प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही; प्रश्न समाजाच्या स्वातंत्र्याचा आणि विचारक्षमतेचा आहे.**

सोशल मीडिया व्यसन लावते, हा आरोप नवीन नाही; पण आता तो आरोप नसून न्यायालयीन निष्कर्ष बनू लागला आहे. अमेरिकेत नुकत्याच झालेल्या एका खटल्यात सोशल मीडिया कंपन्यांनी व्यसन निर्माण करणारी रचना जाणीवपूर्वक केली, असा दावा न्यायालयाने ग्राह्य धरला. सोशल मीडिया हे व्यसन 'अपघाताने' नाही तर 'डिझाइनने' तयार झाले आहे, ही बाब आता सार्वजनिक चर्चेत आली आहे. याचा अर्थ असा की सोशल मीडिया हा तटस्थ तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म नाही. तो वापरकर्त्याला जास्तीत जास्त वेळ स्क्रीनवर ठेवण्यासाठी तयार केलेला एक मानसशास्त्रीय प्रयोग आहे. 'लाईक', 'शेअर', 'नोटिफिकेशन', 'इन्फिनिट स्क्रोल', 'ऑटो प्ले' हे सर्व फीचर्स वापरकर्त्याच्या मेंदूतील प्रणालीला उद्दीपित करतात. मेंदूत डोपामाइन स्रवते आणि वापरकर्ता पुन्हा पुन्हा त्याच ॲपकडे परततो. यालाच तंत्रज्ञानाच्या भाषेत अटेंशन इकॉनॉमी असे म्हणतात. सोशल मीडिया कंपन्यांचा व्यवसाय मॉडेल साधा आहे, वापरकर्ता जितका जास्त वेळ स्क्रीनवर, तितकी जास्त जाहिरात, तितका जास्त नफा. त्यामुळे त्यांचा खरा ग्राहक वापरकर्ता नसून जाहिरातदार असतो. वापरकर्ता हा उत्पादन असतो. त्याचे लक्ष, त्याचा वेळ, त्याची माहिती हेच विकले जाते. म्हणूनच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वापरकर्त्याला सोडत नाहीत. अनंत स्क्रोल ही संकल्पना यासाठीच तयार झाली. पान संपले की पुस्तक बंद होते; पण स्क्रोल संपत नाही. थांबण्याचा क्षणच नाही. त्यामुळे वापरकर्ता थांबत नाही. ही रचना जाणीवपूर्वक आहे. म्हणजेच सोशल मीडिया कंपन्या व्यसन निर्माण करतात आणि त्यातून नफा कमावतात. त्यामुळे अनेक तज्ज्ञांनी सोशल मीडिया कंपन्यांची तुलना तंबाखू कंपन्यांशी करायला सुरुवात केली आहे. आधी सिगारेट कंपन्या म्हणत असत की व्यसन हा ग्राहकाचा दोष आहे; आता सोशल मीडिया कंपन्याही तेच म्हणतात. या व्यसनाचा सर्वात मोठा परिणाम मानसिक आरोग्यावर झाला आहे. विशेषतः किशोरवयीन मुलांमध्ये चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि आत्मविश्वास कमी होणे या समस्या वाढल्या आहेत. अल्गोरिदम बहुतेक वेळा नकारात्मक, भावनिक किंवा सनसनाटी सामग्री पुढे आणतात कारण त्यावर लोक जास्त वेळ थांबतात. त्यामुळे वापरकर्त्याचे मानसिक वातावरण सतत अस्थिर राहते. ही समस्या सामाजिक आहे. कारण सोशल मीडिया आता माहितीचे मुख्य साधन झाले आहे. लोक काय वाचतात, काय पाहतात, काय विचार करतात हे अल्गोरिदम ठरवतात. म्हणजेच सार्वजनिक मत तयार करण्याची प्रक्रिया काही कंपन्यांच्या हातात गेली आहे. अल्गोरिदमचे उद्दिष्ट सत्य नसते; उद्दिष्ट असते एगेंजमेंट. म्हणजेच ज्या गोष्टीवर जास्त प्रतिक्रिया येतील, तीच गोष्ट पुढे येईल. त्यामुळे सनसनाटी, अर्धसत्य, खोटी माहिती, द्वेषपूर्ण सामग्री यांचा प्रसार जास्त होतो. परिणामी समाजात ध्रुवीकरण वाढते, सार्वजनिक चर्चा पातळी घसरते आणि लोकशाहीची गुणवत्ता कमी होते. ही स्थिती धोकादायक अशीच. कारण लोकशाही ही नागरिकांवर चालते; पण माहितीच अल्गोरिदम ठरवत असेल, तर नागरिक स्वतंत्र राहात नाहीत. आता जगभरात सोशल मीडिया कंपन्यांवर नियंत्रण आणण्याची चर्चा सुरू झाली आहे. काही देशांमध्ये अल्गोरिदम पारदर्शकता, मुलांसाठी वापर मर्यादा, डेटा वापर नियंत्रण यांसारखे नियम सुचवले जात आहेत. काही ठिकाणी १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचाही विचार सुरू आहे. हे आवश्यक असेच. कारण ही समस्या वैयक्तिक शिस्तीने सुटणार नाही. ही समस्या उद्योगाच्या रचनेत आहे. उद्योगाचा उद्देशच व्यसन निर्माण करणे असेल, तर वापरकर्त्याने स्वतःवर नियंत्रण ठेवावे, असे सांगणे म्हणजे तंबाखू कंपन्यांनी "धूम्रपान कमी करा" असे सांगण्यासारखे आहे. तंत्रज्ञानाचा वापर समाजासाठी होऊ शकतो. पण समस्या तंत्रज्ञानात नाही; समस्या व्यवसाय मॉडेलमध्ये आहे. आज परिस्थिती अशी आहे की माणूस मोबाईल वापरत नाही; मोबाईल माणसाला वापरतो. आपण माहिती शोधत नाही; अल्गोरिदम आपल्याला माहिती देतात. आपण निर्णय घेत नाही; अल्गोरिदम आपल्याला निर्णयाकडे ढकलतात. हा प्रश्न फक्त तंत्रज्ञानाचा नाही. हा प्रश्न मानवी स्वातंत्र्याचा आहे. हा प्रश्न विचार करण्याच्या क्षमतेचा आहे. हा प्रश्न लोकशाहीच्या भवितव्याचा आहे. सोशल मीडिया हे आता व्यसनाचा उद्योग बनले आहे. आणि इतिहास सांगतो जे उद्योग समाजाला हानी पोहोचवतात, त्यांच्यावर शेवटी समाजच नियंत्रण आणतो. तो क्षण आता दूर नाही.

# युद्ध, पर्यावरण आणि मानवाची दुटप्पी प्रगती

**» युद्ध म्हणजे सीमा, सैनिक आणि राजकारण नव्हे; युद्ध म्हणजे पर्यावरणाचा विध्वंसही असतो. जंगल, पाणी, हवा, माती हे सर्व नष्ट होते. युद्ध संपते, पण पर्यावरणावरची जखम भरत नाही. मानवाचा सर्वात मोठा शत्रू युद्धच आहे.**



मानवाने विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि लोकशाही यामध्ये प्रचंड प्रगती केली; पण एक गोष्ट मात्र बदलली नाही, युद्ध करण्याची प्रवृत्ती. युद्धात सैनिक मरतात, शहरं उद्ध्वस्त होतात, अर्थव्यवस्था कोसळते हे सर्व दिसते. पण युद्धाचा एक खर्च असा आहे जो दिसत नाही आणि तो म्हणजे पर्यावरणाचा खर्च. आणि हा खर्च कधी कधी पिढ्यान्पिढ्या भरावा लागतो.

युद्धाचा पर्यावरणावर परिणाम हा तात्काळ आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारचा असतो. बॉम्बस्फोट, क्षेपणास्त्रे, रॉकेट्स, रणगाडे या सर्वांमुळे जंगल नष्ट होतात, माती विषारी होते, पाण्याचे स्रोत प्रदूषित होतात. अनेक वेळा शेतीयोग्य जमीन कायमची नापीक होते.

युद्ध संपल्यानंतरही त्या जमिनीवर शेती करणे शक्य होत नाही. इतिहासात याची अनेक उदाहरणे आहेत. व्हिएतनाम युद्धात वापरलेल्या रसायनांचा परिणाम आजही त्या प्रदेशात दिसतो. काही रसायनांचे परिणाम अनेक पिढ्यांपर्यंत दिसतात. म्हणजे युद्ध संपते, सरकारे बदलतात, पण पर्यावरणावरचे जखमेचे व्रण कायम राहतात.

आज जग हवामान बदलाच्या संकटाशी झुंज देत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी जगभरात परिषद, करार, लक्ष्ये ठरवली जात आहेत. पण त्याच वेळी जगभरात लष्करी खर्च आणि युद्धे वाढत आहेत. हा सर्वात मोठा विरोधाभास आहे. जगातील लष्करांचा कार्बन उत्सर्जनातील वाटा अंदाजे ५.५ टक्के आहे. म्हणजे जर जगातील सर्व लष्करे एक देश असते, तर तो जगातील मोठ्या प्रदूषक देशांपैकी एक ठरला असता.

युद्धात केवळ बॉम्बस्फोटामुळेच कार्बन उत्सर्जन होत नाही. रणगाडे, विमानं, युद्धनौका, शस्त्रनिर्मिती, सैन्याची वाहतूक, आणि युद्धानंतर होणारी पुनर्बांधणी या सर्व गोष्टी प्रचंड प्रमाणात कार्बन उत्सर्जन करतात. म्हणजे युद्ध हा हवामान बदलाचा मोठा घटक आहे, पण त्याबद्दल फारशी चर्चा होत नाही. रशिया-युक्रेन युद्धामुळे झालेल्या कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण अनेक देशांच्या वार्षिक उत्सर्जनाइतके होते, असे अहवाल सांगतात. म्हणजे युद्ध हे केवळ राजकीय संघर्ष नसून पर्यावरणीय आपत्तीही आहे.

युद्ध संपल्यानंतर शहरांची पुनर्बांधणी करावी लागते. सिमेंट, स्टील, बांधकाम या सर्व प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जन होते. म्हणजे युद्धाचा पर्यावरणीय खर्च युद्ध संपल्यानंतरही सुरूच राहतो.

जंगल जळतात, नद्या प्रदूषित होतात, वन्यजीव नष्ट होतात. काही वेळा संपूर्ण परिसंस्था नष्ट होते. पर्यावरणाचा हा विध्वंस परत भरून काढण्यासाठी अनेक दशके लागतात. काही वेळा तो कधीच भरून येत नाही. युद्धामुळे अनेक वेळा तेल साठे, गॅस पाइपलाइन, औद्योगिक प्रकल्प नष्ट होतात आणि त्यातून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. म्हणजे युद्ध हे पर्यावरणासाठी दुहेरी संकट ठरते, एक म्हणजे थेट विध्वंस आणि दुसरे म्हणजे अप्रत्यक्ष प्रदूषण.

मानवाने प्रगती केली असे आपण म्हणतो. पण ही प्रगती नेमकी कशासाठी? जर आपण विज्ञानाचा उपयोग औषधांसाठी, शेतीसाठी, शिक्षणासाठी करण्याऐवजी शस्त्रांसाठी करत असू, तर ही प्रगती की विनाश, हा प्रश्न विचारावा लागतो. जगातील अनेक देश हवामान बदलावर चर्चा करतात, पण त्याच देशांचा लष्करी खर्च वाढत आहे. एकीकडे कार्बन उत्सर्जन कमी करण्याची घोषणा आणि दुसरीकडे युद्धासाठी इंधन जाळणे ही दुटप्पी भूमिका आहे. जगभरात लष्करी खर्च वाढत आहे आणि त्याच वेळी हवामान बदलाचे संकटही वाढत आहे. याचा अर्थ असा की मानव स्वतःच स्वतःच्या भविष्यावर घाव घालत आहे.

भारतासारख्या देशांसाठी या प्रश्नाचे महत्त्व जास्त आहे. कारण हवामान बदलाचा सर्वात जास्त परिणाम विकसनशील देशांवर होतो. पाणीटंचाई, उष्णतेच्या लाटा, शेतीचे नुकसान या सर्व समस्यांचा सामना भारताला करावा लागतो. म्हणूनच भारताने आंतरराष्ट्रीय राजकारणात युद्धापेक्षा शांततेचा मार्ग स्वीकारणे आणि पर्यावरणीय प्रश्नांवर नेतृत्व करणे आवश्यक आहे. युद्धात कोण जिंकते हा प्रश्न दुय्यम आहे; युद्धात शेवटी पर्यावरण हरते आणि मानवही हरतो. युद्ध जिंकून देश जिंकता येतो; पण नष्ट झालेले जंगल, प्रदूषित झालेले पाणी, विषारी झालेली माती हे परत मिळवता येत नाही. मानवाने दोन महायुद्धे पाहिली, अणुबॉम्ब पाहिला, शीतयुद्ध पाहिले; पण आता जग एका नव्या युद्धात अडकले आहे, ते म्हणजे पर्यावरण वाचवण्याचे युद्ध. आणि या युद्धात शत्रू दुसरा कोणी नसून मानवाची युद्धाची प्रवृत्तीच आहे.

# अनधिकृत बांधकामांवर पालिकेचा हातोडा

## रहाटणी परिसरातील ८८.८७ चौरस मीटर बांधकामे हटवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २७ मधील रहाटणी परिसरात अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने कारवाई करत एकूण ८८.८७ चौरस मीटर क्षेत्रफळावरील बांधकामांचे निष्कासन केले. वृंदावन कॉलनी, तापकीर मळा चौक आणि तापकीर नगर परिसरात ही कारवाई करण्यात आली.

शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून, त्या अनुषंगाने ही कारवाई राबविण्यात आली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई पार पडली.

कारवाईदरम्यान उपअभियंता जयवंत रोकडे यांच्या समन्वयातून महापालिकेच्या धडक कारवाई पथकाने सहभाग घेतला. यामध्ये बीट निरीक्षक किरण पवार, विनोद बजबळकर, दिग्विजय घोटकुळे आणि ज्ञानराज खंडाळे यांचा समावेश होता. कारवाईसाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात आली होती.

यामध्ये एमएसएफचे १२ जवान, एक पोलिस कर्मचारी, महापालिकेचे पाच मजूर तसेच ठेकेदारामार्फत चार मजूर सहभागी झाले होते. जेसीबी ब्रेकर, ट्रॅक्टर ब्रेकर आणि हातोड्यांच्या सहाय्याने अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली.

शहरातील अनधिकृत बांधकामांविरुद्ध अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असून नागरिकांनी बांधकाम करताना नियमांचे पालन करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

# मोशीतील स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** वाहनांची योग्यता (फिटनेस) तपासणी अधिक पारदर्शक व अचूक करण्यासाठी मोशी येथे उभारण्यात आलेले अत्याधुनिक स्वयंचलित चाचणी केंद्र वीजपुरवठ्याअभावी गेल्या काही महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे वाहन योग्यता तपासणीची प्रक्रिया ठप्प झाली असून वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

हे स्वयंचलित चाचणी केंद्र पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयच्या वतीने उभारण्यात आले आहे. पूर्वी वाहनांची तपासणी पूर्णपणे मनुष्यबळावर आधारित होती. निरीक्षक वाहनांचे ब्रेक, दिवे तपासून तसेच काही अंतर वाहन चालवून योग्यता प्रमाणपत्र देत असत. मात्र या पद्धतीत त्रुटी राहण्याची शक्यता होती आणि चाचणीचा निकाल निरीक्षकांच्या वैयक्तिक मतावर अवलंबून राहत होता. वाहनांची तांत्रिक स्थिती अचूकपणे तपासण्यासाठी आणि प्रवासी तसेच मालवाहतूक वाहनांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मोशी येथे स्वयंचलित चाचणी केंद्र उभारण्यात आले. ऑक्टोबर दरम्यान या केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून यंत्रसामग्री बसविणे, प्लंबिंग, इलेक्ट्रिकल कामे तसेच बाहेरील सपाटीकरणाची कामेही पूर्ण झाली आहेत. मात्र, केंद्रापर्यंत जाण्यासाठी रस्ता आणि वीजजोडणी नसल्यामुळे हे केंद्र गेल्या पाच महिन्यांपासून सुरू होऊ शकलेले नाही.

# 'शून्य कचरा' प्रकल्पाची यशस्वी वाटचाल; शहरभर विस्ताराचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** दापोडी व गवळी माथा परिसरात राबविण्यात येत असलेल्या 'शून्य कचरा' प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी होत असून, त्याचा आदर्श घेऊन शहरातील इतर झोपडपट्टी भागांमध्येही अशा प्रकल्पांचा विस्तार करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

आयुक्तांनी प्रकल्पस्थळी भेट देत विविध उपक्रमांची पाहणी केली व घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतली. यावेळी बचतगटातील महिलांशी संवाद साधत त्यांच्या कार्याचे कौतुकही त्यांनी केले. हा प्रकल्प पर्यावरणपूरक आणि शाश्वत नागरी स्वच्छतेच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकल्पांतर्गत घरगुती कचऱ्याचे संकलन करून त्याचे ओला व सुका असे वर्गीकरण केले जाते. त्यानंतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने प्रक्रिया करून सेंद्रिय खत निर्मिती केली जाते. या प्रक्रियेत कार्यरत महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

स्थानिक नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश देत, शहरभर शाश्वत कचरा व्यवस्थापनासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

# मनपाच्या सेवाकर वसुलीची विक्रमी कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये झोपडपट्टी सेवाकर वसुलीत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत तब्बल १ कोटी १० लाख ६० हजार ४२१ रुपयांचा सेवाकर वसूल करण्यात आला असून, गेल्या पाच वर्षांतील ही सर्वाधिक वसुली ठरली आहे.

महापालिकेच्या नियोजनबद्ध वसुली मोहिमा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे प्रशासनाने सांगितले. सेवाकर भरण्यासाठी ऑनलाइन पेमेंट प्रणालीसह ऑफलाइन सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच मार्च २०२६ मध्ये नागरिकांच्या सोयीसाठी विभागाचे कार्यालय साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात आले होते.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष वसुली मोहीम राबवण्यात आली. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने काम केले. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदाची वाढ लक्षणीय आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये २७ लाख ८१ हजार ९०१ रुपये, २०२२-२३ मध्ये ४५ लाख २४ हजार ४८४ रुपये, २०२३-२४ मध्ये ४० लाख ९ हजार ७०५ रुपये, तर २०२४-२५ मध्ये ४५ लाख ३३ हजार ६९७ रुपयांची वसुली झाली होती. यंदा मात्र ही रक्कम थेट १ कोटींच्या पुढे गेल्याने महसुलात मोठी वाढ झाली आहे.

या कामगिरीबाबत महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांचे आभार मानत, नियोजनबद्ध धोरणे आणि नागरिकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे ही विक्रमी वसुली शक्य झाल्याचे सांगितले. तर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आधुनिक तंत्रज्ञान, सुलभ सुविधा आणि विशेष वसुली मोहिमांमुळे महसूल वाढला असून पुढील काळातही महसूल वाढीसाठी असे उपक्रम राबवले जातील, असे स्पष्ट केले.

## गुन्हे शोध पथकाची कारवाई; २७.५५ लाखांचा मुद्देमाल जप्त, मुंबईतून साथीदारही अटक

# हिंजवडीत एम.डी. अंमली पदार्थांसह आरोपी जाळ्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**हिंजवडी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या निर्देशानुसार अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत हिंजवडी पोलिसांनी मोठी कारवाई करत एम.डी. (मेफेड्रोन) अंमली पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. या कारवाईत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपीच्या मुंबईतील साथीदारालाही अटक करण्यात आली आहे.

दि. २४ मार्च २०२६ रोजी हिंजवडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ पांचाळ यांच्या पथकाने पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला. विनोदे वस्ती, वाकड परिसरात चारचाकी वाहनातून अंमली पदार्थ विक्रीसाठी येणाऱ्या इसमाला शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

तपासादरम्यान आरोपी अतुल शंकर बालगुडे (वय ३५, रा. पाथरगाव, ता. मावळ) याच्या ताब्यातून सुमारे ४२ ग्रॅम एम.डी. अंमली पदार्थ (किंमत अंदाजे ४.२० लाख रुपये) तसेच ३.२४ लाख रुपये किमतीची चारचाकी गाडी असा एकूण मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा तपास पुढे नेत पोलिसांनी आरोपीचा साथीदार शाहरुख उर्फ सद्दाम इक्बाल अन्सारी (रा. गोवंडी, मुंबई) याला मुंबईतून अटक केली. त्याच्याकडून तब्बल २० लाख रुपये किमतीचा २०० ग्रॅम एम.डी. अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. यामुळे या संपूर्ण कारवाईत एकूण २७.५५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ पांचाळ करत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त डॉ. बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त विशाल गायकवाड व सहाय्यक पोलीस आयुक्त बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अंमली पदार्थांविरोधातील पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारीवर आळा बसण्यास मदत होणार असून परिसरात समाधान व्यक्त केले जात आहे.

# करदात्यांची संख्या वाढूनही संकलनात घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मालमत्ताधारकांची संख्या वाढत असतानाही पुणे महापालिकेच्या मालमत्ता कराच्या उत्पन्नात सुमारे ३०० कोटी रुपयांची घट झाल्याचे वास्तव समोर आले आहे. सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी महापालिका प्रशासनाला थेट जाब विचारत महसूल घटण्यामागील कारणांचा सखोल शोध घेण्याची मागणी केली आहे.

मार्च अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात महापालिकेला ११.३३ लाख करदात्यांकडून एकूण २,९८५ कोटी रुपये मालमत्ता कराच्या स्वरूपात मिळाल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, या आकड्यात 'अभय योजने'तून जमा झालेल्या ९५५ कोटी रुपयांचा समावेश आहे. ही रक्कम वगळल्यास प्रत्यक्ष नियमित वसुली केवळ २,०३० कोटी रुपयांवर येते. या योजनेसाठी पालिकेला सुमारे ८०० कोटी रुपयांचा दंड माफ करावा लागला आहे.

तुलनेत, २०२४-२५ या आर्थिक वर्षात १०.९५ लाख करदात्यांकडून २,३४६ कोटी रुपये वसूल झाले होते. यंदा करदात्यांची संख्या सुमारे ४० हजारांनी वाढूनही महसुलात मोठी घट झाल्याने कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तसेच, २०२३-२४ मध्ये २,२५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. यंदा सुमारे २०० कोटी रुपयांची घट नोंदवली गेली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बिबट्याने पाडला शेळीचा फडशा

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील नागापूर येथील रिठे मळ्यात गुरुवारी (दि. २) सकाळी साडेसहाच्या सुमारास बिबट्याने गाभण शेळीवर हल्ला करून तिचा फडशा पाडल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी अशोक खेडेकर यांच्या घरासमोरील शेडमध्ये बांधलेल्या शेळीवर बिबट्याने अचानक झडप घातली. हल्ल्यानंतर बिबट्याने शेळीला फरपटत ओढून नेण्याचा प्रयत्न केला. शेळीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून खेडेकर बाहेर धावत आले. त्यांनी आरडाओरड केल्याने बिबट्याने शेळीला सोडून शेतातून पळ काढला. मात्र तोपर्यंत शेळीचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी वनविभागाला कळवले. वनरक्षक अश्विनी डफळ यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. परिसरात बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेऊन लवकरच पिंजरा लावून बंदोबस्त करण्याचे आश्वासन वनविभागाकडून देण्यात आले.

### ग्रामपंचायत कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**शिरूर :** अतिक्रमणाबाबत चौकशी करून अहवाल देण्यासाठी १० ते १५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या कान्हूरमेसाई (ता. शिरूर) येथील ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून अटक केली. बुधवारी (ता. १) सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून या घटनेमुळे स्थानिक प्रशासनात खळबळ उडाली आहे. भरत पोपट गायकवाड (वय ४६) असे अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. अतिक्रमण प्रकरणात अनुकूल अहवाल देण्यासाठी त्यांनी सुरुवातीला १० ते १५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी ४० वर्षीय तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीची पडताळणी करून सापळा रचण्यात आला आणि त्यात गायकवाड यांना रंगेहात पकडण्यात आले. शिक्रापूर पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

---

तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग व नाशिक फाटा-खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पांना गती

# चाकणची वाहतूक कोंडी सुटण्याच्या मार्गावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चाकण :** चाकण औद्योगिक परिसरातील भीषण वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महत्त्वाचे मानले जाणारे तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग विकास प्रकल्प आणि नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर या दोन्ही प्रकल्पांनी महत्त्वाचा टप्पा पार केला असून लवकरच प्रत्यक्ष कामांना सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडीमुळे त्रस्त असलेल्या नागरिक, कामगार आणि उद्योजकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक एनएच-५४८ डी विकसित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने अंतिम अध्यादेश जारी केला आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळामार्फत 'रचना करा, बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' (डीबीओटी) तत्वावर हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. तळेगाव-चाकण-शिक्रापूर हा ५३ किलोमीटर लांबीचा महामार्ग मुंबई-पुणे आणि पुणे-छत्रपती संभाजीनगर या दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. या मार्गावर सध्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने हा रस्ता विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत तळेगाव ते चाकण या २८.३ किलोमीटर अंतरावर चार पदरी उन्नत (एलिव्हेटेड) महामार्ग उभारण्यात येणार आहे, तर तळेगाव ते शिक्रापूर या ५३.२ किलोमीटर अंतरात जमिनीसमांतर चार पदरी रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या मार्गावर १७१ लहान जंक्शन आणि चार मोठे जंक्शन उभारण्यात येणार असून चढ-उतारासाठी चार रॅम्प असतील. तसेच या मार्गावर एकूण सात टोल नाके उभारले जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे ४ हजार ९०२ कोटी रुपये असून या कामासाठी मॉन्टेकार्लो लिमिटेड या कंत्राटदाराची निवड करण्यात आली आहे. या संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत २४ मार्च २०२६ रोजी निर्णय घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड, चाकण आणि राजगुरूनगर परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नियोजित नाशिक फाटा ते खेड या ३० किलोमीटर लांबीच्या ८ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पालाही गती मिळाली आहे. मार्च २०२६ मध्ये या प्रकल्पाच्या तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असून निविदा प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. हा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राबवण्यात येणार असून यासाठी सुमारे ७ हजार ८२७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या एलिव्हेटेड कॉरिडॉरमध्ये सिंगल पिलरवर उभारण्यात येणारा ८ पदरी एलिव्हेटेड फ्लायओव्हर, विद्यमान महामार्गाचे ४ ते ६ पदरी रुंदीकरण आणि स्वतंत्र सर्व्हिस रोडची उभारणी करण्यात येणार आहे. यामुळे स्थानिक वाहतूक आणि लांब पल्ल्याच्या वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध होणार असून वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



दोन्ही महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांना प्रशासकीय व तांत्रिक पातळीवर गती मिळाल्याने आता प्रत्यक्ष कामांना सुरुवात कधी होते याकडे चाकण परिसरातील नागरिक आणि उद्योग क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

---

## थोरांदळेत हनुमान जन्मोत्सव उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** थोरांदळे येथे ग्रामदैवत हनुमंतरायाचा जन्मोत्सव गुरुवारी (दि. २) अत्यंत भक्तिमय आणि जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सूर्योदयाच्या वेळी पारंपरिक पद्धतीने जन्मोत्सव साजरा करण्यात आला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो भाविकांच्या उपस्थितीने संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेले.

उत्तर पुणे जिल्ह्यातील थोरांदळे येथे दरवर्षी साजरा होणारा हनुमान जन्मोत्सव हा परिसरातील मोठा धार्मिक उत्सव म्हणून ओळखला जातो. सर्व भाविकांना दिला जाणारा पुरी-गुळवणीचा महाप्रसाद हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण मानले जाते. या प्रसादामुळे थोरांदळ्याची ख्याती दूरवर पोहोचली असून दरवर्षी भाविकांची संख्या वाढत आहे.



जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गेल्या सात दिवसांपासून गावात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थांच्या एकजुटीने आणि उत्साहपूर्ण सहभागामुळे सप्ताहातील सर्व धार्मिक कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला.

जन्मोत्सवदिनी सकाळी ह. भ. प. नंदकिशोर महाराज सोनवणे (रांजणी) यांच्या सुश्राव्य वाणीतून हनुमान जन्माचे काल्याचे कीर्तन पार पडले. कीर्तनावेळी भाविकांच्या जयजयकारांनी परिसर दुमदुमून गेला. कीर्तनानंतर भक्तिगीत, हरिनामाचा गजर आणि विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. कीर्तनानंतर पुरी-गुळवणीच्या महाप्रसादाचे वितरण सुरू करण्यात आले. मोठ्या प्रमाणावर तयार करण्यात आलेल्या महाप्रसादाचा भाविकांनी मनसोक्त लाभ घेतला. महाप्रसाद वितरणावेळी सामाजिक एकात्मता, भक्तीभाव आणि ग्रामस्थांचा जिव्हाळा यांचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. ग्रामस्थांच्या अथक परिश्रमामुळे आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे थोरांदळे येथील हनुमान जन्मोत्सव यंदाही भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

---

## चैत्र पौर्णिमेला खंडोबाच्या दर्शनासाठी गर्दी

सदानंदाचा येळकोट व जय मल्हारच्या नामघोषात दर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील कुलस्वामी खंडोबा मंदिरात चैत्र पौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी (दि. २) चैत्र पौर्णिमेच्या मुहूर्तावर शेकडो भाविकांनी "सदानंदाचा येळकोट" व "जय मल्हार"च्या नामघोषात पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन घेतले.

चैत्र पौर्णिमेनिमित्त खंडेरायाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगावर चैत्र महिन्यातील वसंत ऋतूतील दुसरी वासंतिक चंदनउटी साकारण्यात आली. खंडोबा, म्हाळसाई, बाणाई तसेच स्वयंभू सप्तशिवलिंगावर साकारलेल्या चंदनउटीचे मनमोहक रूप पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. धार्मिक कार्यक्रमांची सुरुवात पहाटे चार वाजता मंदिरातील घंटानादाने



झाली. त्यानंतर पहाटे पाच वाजता आठ जोडप्यांच्या हस्ते वसंत पूजा, दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक संपन्न झाला. देवस्थानातील सेवेकऱ्यांनी स्वयंभू सप्तशिवलिंग तसेच पंचधातूच्या खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मुखवट्यांवर केशर व सुगंधी अत्तरमिश्रित चंदनउटीचा लेप दिला. यानंतर खंडेरायाला पुरणपोळी व भजी-कुरडईचा नैवेद्य दाखवून शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. मंदिराच्या सभामंडपात अभंग, भजन व सनईच्या मंगल धून सुरू होत्या, त्यामुळे परिसर भक्तिमय वातावरणाने भरून गेला होता. मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटे स्वयंभू शिवलिंगावर चंदनउटी लेपन झाल्यानंतर उपस्थित भाविकांच्या कपाळाला चंदनउटी व भंडारा लावण्यात आला. त्यानंतर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले. पुणे, नगर, नाशिक, मुंबई, भोसरी, पिंपरी-चिंचवड परिसरातून भाविक सहकुटुंब दर्शनासाठी आले होते. मंदिर परिसरात तळीभंडार, फुले, पेढे आदींची दुकाने लागली होती. मंदिराच्या जागरण मंडपात पाच नामांची जागरणे सुरू होती. वाघे व वीर मंडळी पारंपरिक पद्धतीने जागरण करताना दिसत होती. चैत्र पौर्णिमा व हनुमान जयंतीनिमित्त घरोघरी खंडोबा-म्हाळसाईच्या टाकांची पूजा व पुरणपोळीच्या नैवेद्याची तयारी करण्यात आली होती.

धामणी ग्रामस्थांनी २०२४ पासून तब्बल ६६ वर्षांनंतर खंडोबा देवस्थान मंदिरात चंदनउटी लेपन सोहळा पुन्हा सुरू केला असून गुढीपाडवा, चैत्र पौर्णिमा व अक्षय तृतीया या तीन सणांच्या दिवशी हा सोहळा आयोजित केला जातो, अशी माहिती देवस्थानच्या वतीने देण्यात आली.

दरम्यान, धामणी पेठेतील पुरातन मारुती मंदिरात अभिषेक व भजन कार्यक्रमही पार पडला. मारुतीच्या दर्शनासाठी व गुळाची शेरणी वाटण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

---

## विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे पालन करावे



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय मोटारसायकल चालवू नये आणि १८ वर्षांनंतरही वाहन चालवताना परवाना व हेल्मेट अनिवार्य आहे, असे प्रतिपादन सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे यांनी केले.

पारगाव कारखाना पोलिस स्टेशनच्या वतीने निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात रस्ता सुरक्षा व सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे हा गुन्हा असून असे निदर्शनास आल्यास पालकांवरही कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. मोबाईलवर येणाऱ्या संशयास्पद लिंक डाउनलोड करू नयेत, कोणालाही ओटीपी शेअर करू नये, तसेच वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सतर्क राहावे, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व सायबर सुरक्षेची शपथ देण्यात आली. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेतील विविध उपक्रम व शाळा सुरक्षा विषयक माहिती प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी दिली.

कार्यक्रमास गावचे पोलिस पाटील विठ्ठल वळसे पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक मोहन दरेकर यांनी केले तर आभार विनोद बारवकर यांनी मानले.

---

## नराधम बापाचा मुलीवर अत्याचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** चाकण परिसरातून माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. एका नराधम बापाने आपल्या स्वतःच्या १५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. १५ वर्षांच्या पिडीत मुलीच्या तक्रारीवरून ३९ वर्षीय नराधम बापावर चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीची आई एका खाजगी कंपनीत कामाला जाते. नेहमीप्रमाणे सोमवारी सकाळी १०.३० च्या सुमारास आई कामावर निघून गेली होती. त्यावेळी घरात मुलगी आणि तिचे वडील हे दोघेच होते. घरात कोणीही नसल्याची संधी साधून बापाने आपल्या पोटच्या मुलीला धमकावले व आक्षेपार्ह स्पर्श करत जबरदस्तीने बलात्कार केला. पोलिसांनी नराधम वडिलांना बापाला अटक केली आहे.

---

## गॅस टँकरमधून सिलिंडरमध्ये अवैध भरणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** गॅस टँकरमधून घरगुती सिलिंडरमध्ये अवैधरित्या गॅस भरून काळाबाजार करणाऱ्या टोळीवर उत्तर चाकण पोलिसांनी छापा टाकत तिघांना रंगेहात पकडले. मंगळवारी पहाटे ही कारवाई करण्यात आली असून सुमारे ४९ लाख ५७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चाकण-शिक्रापूर रस्त्यावरील भोसे (ता. खेड) गावाच्या हद्दीत, इंडियन ऑइल कंपनीच्या पार्किंगजवळील पेट्रोल पंप परिसरात हा प्रकार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार छापा टाकल्यावर गॅस टँकर (कॅप्सूल) मधून नोजलच्या साह्याने घरगुती गॅस सिलिंडरमध्ये बेकायदेशीररीत्या गॅस भरला जात असल्याचे उघड झाले.




या प्रकरणी अंबादास रोहीदास गाडे (४२, चेंबूर, मुंबई; मूळ-परळी वैजनाथ, बीड), अक्षय रमेश मुंगसे (२५, रासे, ता. खेड) आणि नवनाथ अंकुश होजगे (३४, भोसे, ता. खेड) या तिघांना अटक करण्यात आली आहे. पोलीस हवालदार भैरोबा यादव यांनी उत्तर चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी गॅस टँकरचे सील तोडून त्याला काळ्या रंगाचा नोजल पाईप जोडला होता. कोणतीही सुरक्षा साधने न वापरता अत्यंत धोकादायक पद्धतीने ते गॅस काढून सिलिंडरमध्ये भरत होते. आर्थिक फायद्यासाठी हा गॅस चोरून जास्त दराने विकण्याचा त्यांचा उद्देश होता. या कारवाईत मोठ्या प्रमाणात गॅस, उपकरणे व इतर साहित्य असा एकूण ४९.५७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उत्तर चाकण पोलीस करत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे, पोलीस हवालदार भैरोबा यादव, ढमढेरे, कोळेकर तसेच पोलीस शिपाई कोळी आणि जगझाप यांनी केली.

दरम्यान, चाकण परिसरात गॅस टँकरमधून घरगुती सिलिंडरमध्ये अवैध गॅस भरण्याचा प्रकार अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे समोर येत आहे. दोन वर्षांपूर्वी मोहितेवाडी येथे अशाच प्रकारे गॅस काढताना भीषण स्फोट झाला होता. त्यामुळे अशा कारवायांवर कठोर नियंत्रणाची मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

अवकाळी पाऊस व गारपिटीचा शेती पिकांना, पशुधनाला फटका

# आंबेगाव पूर्व भागात अवकाळीने शेतीचे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बुधवारी (दि. १) दुपारी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेती पिकांचे, पशुधनाचे तसेच व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी हतबल झाले आहेत.



खडकवाडी, लोणी, वाळुंजनगर, वडगावपीर, लाखनगाव, पोंदेवाडी, धामणी तसेच रानमळा मांदळेवाडी या भागांत अवकाळी पावसामुळे कांदा, गहू, जनावरांचे खाद्य यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वाळुंजनगर येथे गारांच्या मारामुळे तब्बल २० मेंढ्यांचा मृत्यू झाला. काही ठिकाणी घरांच्या भिंती तसेच पोल्ट्री शेडच्या भिंती कोसळल्याच्या घटनाही घडल्या.

खडकवाडी येथील भैरवनाथ यात्रेलाही अवकाळी पावसाचा फटका बसला. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या पावसामुळे यात्रेत आलेल्या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच नियोजित कुस्त्यांचा आखाडा रद्द करावा लागला. बाहेरून आलेल्या पैलवानांना खडकवाडी ग्रामस्थांकडून ये-जा भाडे देण्यात आले. पाळण्यावाले, कपड्यांचे व्यापारी तसेच इतर दुकानदारांनाही आर्थिक फटका बसला. दर्शनासाठी आलेल्या भाविकांचीही अवकाळी पावसामुळे मोठी तारांबळ उडाली, अशी माहिती खडकवाडीचे माजी सरपंच अनिल डोके यांनी दिली.

पूर्व भागात झालेल्या गारपिटीची पाहणी पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेकदादा वळसे पाटील, जिल्हा परिषद सदस्य विष्णूकाका हिंगे, पंचायत समिती सदस्य अंकिता वाळुंज तसेच शरद सहकारी बँकेचे संचालक अशोक आदक पाटील यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन केली. नुकसानग्रस्त भागाचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

वाळुंजनगर येथील मेंढपाळ व शेतमालाचे मोठे नुकसान झाले असून पंचनामे करून तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी प्रगतशील शेतकरी भगवान शिनलकर, बाळासाहेब वाळुंज पाटील, सतीश रोडे पाटील तसेच वाळुंजनगरचे माजी उपसरपंच महेंद्र वाळुंज व जयेश वाळुंज यांनी केली आहे.

---

## इंदापूर बांधकाम कामगार समितीच्या सहअध्यक्षपदी शब्बीर सय्यद (काझी)

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** इंदापूर तालुका बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समितीच्या सहअध्यक्षपदी शब्बीर रमजानभाई सय्यद (काझी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे जिल्हा कार्यकारी अधिकारी रा. ब. पाटील यांनी या नियुक्तीचे पत्र जारी केले आहे.

तालुक्यातील बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, तसेच त्यांच्या समस्या स्थानिक स्तरावर सोडविण्यासाठी तालुकास्तरावर बांधकाम कामगार




स्थानिक संनियंत्रण समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. त्या समितीच्या सहअध्यक्षपदी सय्यद यांची निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीबाबतचे पत्र कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, शब्बीर सय्यद (काझी) तसेच शासनाच्या संबंधित विभागांना पाठविण्यात आले आहे. शब्बीर सय्यद हे सणसर सोसायटीचे माजी अध्यक्ष असून ते राष्ट्रवादी काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. तसेच ते कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात.

## सारांश वृत्त

### कर्नाटकात सायबर गुन्हे वाढले

**बंगळूर:** कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी राज्यात सायबर गुन्हे आणि अमली पदार्थांशी संबंधित गुन्हे वाढत असल्याचा इशारा दिला आणि ते रोखण्यासाठी पोलिसांनी कठोर व प्रभावी उपाययोजना कराव्यात असे आवाहन केले. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी तंत्रज्ञानाचा अधिक चांगला वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. 'कर्नाटक पोलीस ध्वज दिन' कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.



### आंध्र प्रदेशात सर्वाधिक जीएसटी संकलन

**अमरावती** : आंध्र प्रदेशने मार्च महिन्यात ३,३१६ कोटी रुपयांचे आतापर्यंतचे सर्वाधिक निव्वळ जीएसटी संकलन नोंदवले असून, या महिन्यात १० टक्के वाढ नोंदवली आहे, असे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सांगितले. अनेक संरचनात्मक आणि धोरणात्मक आव्हाने, विशेषतः जीएसटी २.० सुधारणा असूनही, २०२५-२६ या आर्थिक वर्षातही एकूण जीएसटी संकलनात सहा टक्क्यांनी वाढ झाली, असेही ते म्हणाले. मार्च महिन्यात निव्वळ जीएसटी संकलन ३,३१६ कोटी रुपये होते, तर उपकर वगळून एकूण जीएसटी संकलन ३,७७३ कोटी रुपये होते, अशी माहिती राज्याचे कर मुख्य आयुक्त ए. बाबू यांनी बुधवारी जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात दिली.



### महिला तंत्रज्ञेची छळामुळे आत्महत्या

**हैदराबाद** : बिहारमधील एका २६ वर्षीय सॉफ्टवेअर व्यावसायिक महिलेने पतीकडून अतिरिक्त हुंड्यासाठी होणाऱ्या 'छळा'मुळे येथे तिच्या राहत्या घरी कथितरित्या आत्महत्या केली, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. बुधवारी फ्लॅटच्या हॉलमधील छताच्या पंख्याला लटकलेल्या अवस्थेत ती महिला आढळली. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले.

## सर्वोच्च न्यायालयाची पश्चिम बंगाल सरकारला फटकार

# न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यात एसआयआर (एसआयआर) कारवाईदरम्यान सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवल्याच्या गंभीर घटनेची सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दखल घेत राज्य सरकारवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. तसेच राज्याचे गृह सचिव, पोलीस महासंचालक (डीजीपी) आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेबद्दल स्पष्टीकरण मागवले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत तसेच न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठाने या घटनेवर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, ही घटना केवळ न्यायिक अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न नसून सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारालाच आव्हान देण्याचा निर्लज्ज प्रयत्न



आहे. न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना ही घटना सुनियोजित आणि हेतुपुरस्सर असल्याचे म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला या प्रकरणाची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) किंवा राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) यापैकी एका संस्थेकडे सोपवण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित संस्थेने प्राथमिक चौकशी अहवाल थेट न्यायालयात सादर करावा, असेही आदेश देण्यात आले आहेत.

न्यायिक अधिकाऱ्यांचे संरक्षण करण्यात राज्य प्रशासन अपयशी ठरल्याबद्दल न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारवर कठोर टीका केली. अधिकाऱ्यांना धोका असल्याची माहिती असूनही त्यांना सुरक्षित बाहेर का काढण्यात आले नाही, याचे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

माध्यमांतील वृत्तानुसार, मतदार यादीत नावे नसल्यामुळे संतप्त नागरिकांनी मालदा जिल्ह्यात आंदोलन केले आणि त्यावेळी न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवण्यात आले होते. या घटनेदरम्यान जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक अनुपस्थित असल्याबद्दलही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. परिस्थिती गंभीर झाल्यानंतर कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना हस्तक्षेप करावा लागला आणि त्यानंतर अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. न्यायालयाने नमूद केले की, मध्यरात्रीनंतर न्यायिक अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. मात्र, ते परत जात असताना त्यांच्या वाहनांवर दगडफेक आणि काठ्यांनी हल्ला करण्यात आला. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने न्यायिक अधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी केंद्रीय सुरक्षा दल तैनात करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत. तसेच संभाव्य धोका लक्षात घेऊन सुरक्षा व्यवस्था वाढवण्याचे आदेश दिले आहेत. आक्षेप नोंदवण्यासाठी किंवा सुनावणीसाठी दोन ते तीनपेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश देऊ नये आणि पाचपेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र जमू देऊ नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, मुख्य सचिव, डीजीपी, जिल्हाधिकारी आणि एसएसपी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांना ६ एप्रिल रोजी ऑनलाइन उपस्थित राहण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

## ममता बॅनर्जींचा भाजप-आयोगावर आरोप



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सुती/सागरदिघी** : पश्चिम बंगालमधील मालदा येथे न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आल्याच्या घटनेवरून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी भाजप आणि निवडणूक आयोगावर तीव्र टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह बंगालमध्ये अशांतता निर्माण करून विधानसभा निवडणुकांपूर्वी राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा 'षडयंत्राचा आराखडा' आखत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

मुर्शिदाबाद जिल्ह्यातील सागरदिघी आणि सुती येथील सभांमध्ये बोलताना बॅनर्जी यांनी नागरिकांना संयम राखण्याचे आणि "भाजपच्या जाळ्यात" अडकू नये, असे आवाहन केले. न्यायिक अधिकाऱ्यांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरल्याबद्दल त्यांनी निवडणूक आयोगालाही जबाबदार धरले. "माझे प्रशासकीय अधिकार काढून घेण्यात आले आहेत आणि बंगालची बदनामी होत आहे. विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान सात न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला; मात्र या घटनेची माहिती प्रशासनातील कुणीही मला दिली नाही," असे बॅनर्जी यांनी नमूद केले. निवडणूक आयोगाच्या हस्तक्षेपानंतर काही अधिकार काढून घेण्यात आले असले तरी आपण ही लढाई राजकीय पातळीवर लढत असल्याचा दावा त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## बंगालमध्ये अराजकतेचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेदरम्यान सात न्यायिक अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आल्याच्या घटनेवरून भाजप खासदार बासुरी स्वराज यांनी तृणमूल काँग्रेसवर जोरदार टीका केली. बंगालमध्ये अराजकता असल्याचा आरोपही त्यांनी केले.

लोकसभेतील शून्य प्रहारादरम्यान हा मुद्दा उपस्थित करताना त्या म्हणाल्या की, बुधवारी अत्यंत गंभीर घटना घडली ज्यामध्ये "लोकशाही चिरडली गेली." पश्चिम बंगालमधील मालदा परिसरात सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी न्यायिक अधिकाऱ्यांना, विशेषतः महिला अधिकाऱ्यांना, तासनतास डांबून ठेवले, असा आरोप त्यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाने या घटनेची दखल घेतली असून पश्चिम बंगालमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा पूर्णपणे भंग झाल्याचे निरीक्षण नोंदवले आहे, असेही त्यांनी सांगितले. संसदेकडून या प्रकरणावर स्पष्ट संदेश दिला जावा आणि पश्चिम बंगालमधील अशी अराजकता सहन केली जाणार नाही, असा आग्रह त्यांनी केंद्र सरकारकडे केला.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालय ने एसआयआर मोहिमेदरम्यान मालदा जिल्ह्यात सात न्यायिक अधिकाऱ्यांवर झालेल्या घेराव आणि हल्ल्याच्या प्रकरणी कारवाई न केल्याबद्दल पश्चिम बंगाल प्रशासनावर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत. तसेच या प्रकरणाची चौकशी सीबीआय किंवा एनआयएमार्फत करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना या घटनेमुळे राज्य प्रशासनाचे अपयश उघड झाले असून पश्चिम बंगाल हे सर्वाधिक ध्रुवीकरण झालेले राज्य असल्याचेही नमूद केले आहे.

## उमेदवारीवरून काँग्रेस मुख्यालयात हिंसाचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार निवडीवरून सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान बुधवारी पश्चिम बंगाल प्रदेश काँग्रेसच्या मुख्यालयात हिंसाचार उसळला. संतप्त कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारीत किमान एक कार्यकर्ता जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

"बाहेरच्या" उमेदवारांना माघार घेण्याच्या मागणीसाठी कार्यकर्त्यांनी निदर्शने सुरू केली होती. मात्र, काही वेळातच या आंदोलनाचे रूप प्रतिस्पर्धी गटांमधील संघर्षात



झाले. पक्षाध्यक्ष सोमेन मित्रा यांचे पुत्र रोहन मित्रा यांना बालीगंज विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. आंदोलकांनी दावा केला की, या जागेसाठी आधी झायेद हुसेन यांना तिकीट देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र नंतर त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. तसेच, विधानसभा निवडणुकीसाठी तिकिटे विकण्यात आल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी पक्ष मुख्यालयात पोस्टरही लावले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, जोरदार वादानंतर कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. पोलिसांच्या उपस्थितीतच दोन्ही गटांमध्ये मारामारी झाली. या संघर्षादरम्यान एका काँग्रेस कार्यकर्त्याच्या डोक्यात रॉडने मारहाण करण्यात आल्याने तो जखमी झाला. तसेच झटापटीदरम्यान एक महिला कार्यकर्ती बेशुद्ध पडल्याचीही माहिती समोर आली आहे. काही कार्यकर्त्यांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करत घोषणाबाजी केली आणि हिंसाचारात सहभागी असलेल्या व्यक्तींना अटक करण्याची मागणी केली. काही कार्यकर्त्यांनी युवक काँग्रेस नेते काशिफ रझा यांच्यावर समर्थकांच्या माध्यमातून अशांतता भडकवल्याचा आरोप केला आहे. तसेच महिला कार्यकर्त्यांवर गैरवर्तन झाल्याचे आरोपही करण्यात आले आहेत.

दरम्यान, काँग्रेसने रविवारी २८४ विधानसभा जागांसाठी उमेदवारांची घोषणा केल्यानंतर राज्यातील अनेक जिल्ह्यांत उमेदवार निवडीवरून असंतोष निर्माण झाला आहे. अमता, बागनान, श्यामपूर, उलुबेरिया दक्षिण आणि उलुबेरिया पूर्व या मतदारसंघांतही आंदोलन झाल्याचे वृत्त आहे.

## "मी न्याय मागायला आलो, मला न्याय हवा"

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुचिरापल्ली** : करूर येथील भीषण चेंगराचेंगरीची घटना तसेच आपल्या शेवटच्या 'जननायगन' चित्रपटाच्या प्रदर्शनामागे संयुक्त कट असल्याचा गंभीर आरोप विजय यांनी गुरुवारी केला. करूर घटनेत आपल्यालाही न्याय मिळावा, अशी मागणी त्यांनी केली.

तिरुचिरापल्ली पूर्व विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल



केल्यानंतर आयोजित निवडणूक सभेत ते बोलत होते. २७ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांनी संबोधित केलेल्या सभेत झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. या घटनेबाबत अनेक जण सांगत आहेत त्याप्रमाणे हा "संयुक्त कट" असल्याचा आरोप त्यांनी केला. "मी तुमच्यासाठी न्याय मागायला आलो आहे, पण मलाही न्याय हवा आहे," असे ते म्हणाले. तसेच आपल्या शेवटच्या 'जननायगन' चित्रपटाच्या प्रदर्शनामागेही षडयंत्र असल्याचा दावा त्यांनी केला. विजय यांनी मतदारांना डीएमके आणि भाजप या दोन्ही पक्षांना "एकाच विचाराचे" म्हणत नाकारण्याचे आवाहन केले आणि आपल्या पक्षाला संधी देण्याचे सांगितले. डीएमकेने २०२१ च्या निवडणुकीतील आश्वासने पूर्ण केली नाहीत आणि आता पुन्हा खोटी आश्वासने देत असल्याचा आरोप त्यांनी केला.

## लष्करप्रमुख अमीर हातामी यांचे वक्तव्य

# इराणचा अमेरिकेला कडक इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान** : अमेरिकेसोबत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणचे लष्करप्रमुख अमीर हातामी यांनी गुरुवारी अत्यंत कठोर इशारा दिला. शत्रूने जमिनीवरून हल्ला केला, तर एकही व्यक्ती जिवंत राहणार नाही, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेकडून इराणवर जमिनीवरील हल्ल्याची शक्यता व्यक्त केली जात असताना हातामी यांचे हे वक्तव्य समोर आले आहे. अमेरिकन सैन्य मध्य-पूर्वेत पोहोचले असून तणाव आणखी वाढला आहे. इराणच्या वृत्तसंस्थेनुसार, हातामी यांनी सांगितले की, गरज पडल्यास लष्करी कारवाई तीव्र करण्यासाठी तेहरान पूर्णपणे तयार आहे.

"शत्रूने जमिनीवरून हल्ला केल्यास, एकाही व्यक्तीचा जीव वाचवता कामा नये. जोपर्यंत आम्ही आमचे निर्धारित लक्ष्य साध्य करत नाही, तोपर्यंत आम्ही शत्रूंचा पाठलाग थांबवणार नाही," असे त्यांनी म्हटले.

ते म्हणाले की, इस्लामिक इराणची रणनीती स्पष्ट आहे— देशावरून युद्धाची छाया दूर करणे



आणि सर्व नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणे. काही ठिकाणे सुरक्षित आणि काही ठिकाणे असुरक्षित असणे स्वीकारार्ह नाही, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, इराणने शिराझ शहरावरून उडणारा इस्रायलचा हर्मिस ९०० ड्रोन पाडल्याचा दावा केला आहे. तसेच, शत्रूच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून आक्रमक आणि बचावात्मक दोन्ही स्तरांवर लष्कर पूर्णपणे सज्ज असल्याचेही हातामी यांनी सांगितले.

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने तेहरानसह इराणमधील अनेक ठिकाणांवर हल्ले केल्यानंतर या संघर्षाची तीव्रता वाढली. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायलच्या भूभागावर तसेच पश्चिम आशियातील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ले केले. या तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत अघोषित नाकेबंदीची स्थिती निर्माण झाली असून जागतिक तेल पुरवठ्यावर त्याचा परिणाम होत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी संकेत दिले आहेत की, अमेरिका इराणमधील लष्करी कारवाई लवकरच संपवू शकते. व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले की, अमेरिकी सैन्य पुढील दोन ते तीन आठवड्यांत इराणमधून बाहेर पडू शकते. तसेच, अमेरिका माघार घेतल्यानंतर जागतिक इंधनाच्या किमती कमी होऊ शकतात, असेही त्यांनी म्हटले.

## इराणमधील भारतीय नागरिक सुरक्षित

**नवी दिल्ली** : इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील युद्धामुळे पश्चिम आशियातील बिघडत चाललेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तेहरानने भारताला एक मोठे आश्वासन दिले आहे. भारतातील इराणी दूतावासाने गुरुवारी भारतीय नागरिकांना त्यांच्या सुरक्षेबाबत आश्वस्त करण्यासाठी एक संदेश जारी केला. या संदेशात इराणी दूतावासाने म्हटले आहे की, भारतीय नागरिक सुरक्षित हातात आहेत आणि त्यांनी काळजी करण्याची गरज नाही, असे यात नमूद केले आहे.

## राजस्थान निवडणूक आयोगाला अवमान नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर** : राज्यातील ग्रामपंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास झालेल्या विलंबाबाबत राजस्थान उच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्त राजेश्वर सिंह यांना अवमान नोटीस बजावली आहे. न्यायालयाने आयोगाने पूर्वी निश्चित केलेल्या मुदतीनंतर मतदार यादी सुधारणेचे वेळापत्रक कसे जाहीर केले, असा सवाल उपस्थित केला आहे.

माजी आमदार संयम लोढा यांनी





दाखल केलेल्या अवमान याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायाधीश एस. पी. शर्मा यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सुनावणी घेतली. आयोगाला चार आठवड्यांच्या आत सविस्तर उत्तर सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर २०२५ रोजी राजस्थानमधील पंचायत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका १५ एप्रिल २०२६ पर्यंत घेण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्याप निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. पुनीत सिंघवी यांनी न्यायालयाला सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने २२ एप्रिल रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे वेळापत्रक प्रस्तावित केले आहे. त्यामुळे १५ एप्रिलपर्यंत निवडणुका घेणे अशक्य होणार आहे.

न्यायालयात जाण्यापूर्वी संयम लोढा यांनी राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला कायदेशीर नोटीस देऊन मतदार यादी सुधारणा वेळापत्रक अंतिम मुदतीशी सुसंगत ठेवण्याची मागणी केली होती. पालन न केल्यास अवमान कारवाईचा इशाराही देण्यात आला होता. त्यानंतर अवमान याचिका दाखल करण्यात आली. राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता राजेंद्र प्रसाद यांनी निवडणुका पुढे ढकलण्याबाबत याचिका दाखल करण्याचा सरकारचा विचार असल्याचे सांगितले. मात्र न्यायालयाने स्पष्ट केले की, तो वेगळा मुद्दा असला तरी आयोगाने न्यायालयाच्या आदेशाचे पालन केले का, हा सध्याचा मुख्य प्रश्न आहे.

## आय-पॅक संबंधित ठिकाणांवर छापे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमधील कथित कोळसा तस्करी व अपहार प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) गुरुवारी देशातील विविध शहरांमध्ये छापेमारी करत राजकीय सल्लागार संस्था आय-पॅकशी संबंधित ठिकाणांची झडती घेतली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंगळूर, हैदराबाद आणि दिल्ली येथील काही ठिकाणी ही कारवाई सुरू आहे.

या छापेमारीत आय-पॅकचे सह-संस्थापक आणि संचालक ऋषी राज सिंह यांच्या कार्यालयाचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. यापूर्वी जानेवारी महिन्यातही ईडीने आय-पॅकच्या कार्यालयावर तसेच



संस्थापकांपैकी एक प्रतीक गांधी यांच्या कोलकाता येथील निवासस्थानी छापे टाकले होते. ईडीने या प्रकरणात सिंह आणि जैन यांना जबाब नोंदवण्यासाठी समन्स बजावले होते. मात्र, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमधील निवडणूक कामांचा दाखला देत त्यांनी या नोटिसांना आव्हान देण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

या प्रकरणातील पुढील तपास ईडीकडून सुरू असून या छापेमारीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

## होर्मुझ संकटावरून चीनचा थेट आरोप

# अमेरिका-इस्रायलमुळेच ऊर्जा संकट गडद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली/बीजिंग** : पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या जागतिक ऊर्जा संकटावरून आता महासत्तांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून चीन ने सध्याच्या होर्मुझ संकटासाठी थेट अमेरिका आणि इस्रायल यांनाच जबाबदार ठरवले आहे. इराणवर झालेल्या हल्ल्यांमुळेच इराणने होर्मुझ सामुद्रधुनी मार्ग रोखल्याचा आरोप चीनने केला आहे.

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी बीजिंगमध्ये पत्रकार परिषदेत सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनीतील



जलवाहतुकीवरील अडथळ्यांचे मूळ कारण म्हणजे अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध केलेल्या लष्करी कारवाया आहेत. लष्करी मार्गाने कोणत्याही समस्येचे समाधान होऊ शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी प्रभावित देशांनीच होर्मुझ मार्ग खुला ठेवण्याची जबाबदारी घ्यावी, असे वक्तव्य केले. ज्या देशांना या मार्गातून तेल मिळते त्यांनीच त्या जलमार्गाच्या सुरक्षेची जबाबदारी घ्यावी, असे त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेच्या या भूमिकेमुळे जागतिक राजकारणात नवीन समीकरणे तयार होत असल्याचे मानले जाते.

होर्मुझ सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग मानला जातो. आखाती देशांतील मोठ्या प्रमाणावरील तेल निर्यात याच मार्गातून होते. जगातील मोठा तेलपुरवठा या मार्गावर अवलंबून असल्यामुळे या मार्गात अडथळा निर्माण झाला की तेलाच्या किमती लगेच वाढतात. चीन, भारत, जपान आणि युरोपमधील अनेक देश या मार्गातून तेल आयात करतात.

चीन हा इराणच्या तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार देश असल्यामुळे या संकटाचा सर्वाधिक परिणाम चीनवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच चीनने या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेत अमेरिका आणि इस्रायलवर आरोप केले आहेत, असे आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक मानतात.

पश्चिम आशियातील युद्ध आणि होर्मुझ मार्गातील तणावामुळे जागतिक तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूड तेलाची किंमत प्रति बॅरल जवळपास १०० डॉलरपर्यंत पोहोचली असून एकूण तेलाच्या किमतींमध्ये ४० ते ५० टक्क्यांची वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. याचा परिणाम वाहतूक, उद्योग आणि विमान वाहतूक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात होत आहे. इंधनदरवाढीमुळे अनेक आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी इंधन अधिभार वाढवला असून काही विमान कंपन्यांनी युद्धग्रस्त प्रदेश टाळण्यासाठी उड्डाणांचे मार्गही बदलले आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानप्रवास महाग होण्याची शक्यता आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे आता अमेरिका-इस्रायल आणि इराण-चीन अशा दोन गटांमध्ये तणाव वाढताना दिसत आहे. ऊर्जा, तेल पुरवठा आणि सागरी मार्ग यावरून जागतिक राजकारणात नवीन संघर्ष निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

तेलाच्या किमती वाढल्यामुळे भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांवरही मोठा आर्थिक ताण येऊ शकतो. पेट्रोल-डिझेल दरवाढ, महागाई वाढ, विमानप्रवास महाग होणे आणि उद्योगांचे उत्पादन खर्च वाढणे असे परिणाम पुढील काळात दिसू शकतात.